**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठात व्हर्च्युअल सी-फोरद्वारे**
**सचिन इटकर व मोहिनी मोडक यांचे व्याख्यान संपन्न**
**व्याख्यान ऐकण्यासाठी विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध**

अमरावती -

विद्यापीठाच्या व्हर्च्युअल सी-फोरवरुन 'जगाचे भवितव्य (कोव्हिडमुळे निर्माण झालेली आव्हाने, भारताला होणारा लाभ आणि युवकांपुढील संधी)' या विषयावर स्ट्रेटेजिक फोरसाईट गृप आणि आरोग्य सुरक्षा क्षेत्रातील जाणकार, पुणे येथील वरिष्ठ कार्यकारी सल्लागार श्री सचिन इटकर यांचे तर 'ब्लॉग लेखन : व्यावसायिक संधी' व 'सायबर सुरक्षा : खबरदारी आणि उपाय' या विषयावर आयटी व्यावसायिक, स्तंभ लेखिका आणि ब्लॉगर, अकोलाच्या मोहिनी महेश मोडक यांचे व्याख्यान संपन्न झाले.

व्याख्यानप्रसंगी मार्गदर्शन करतांना श्री इटकर म्हणाले, जगावर अनेक संकटे यापूर्वी येवून गेलीत, त्याचा सामना जगाने केला आहे. आज वेगाने होणारे बदल सर्वांसमोर आव्हान आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान, माहिती व ज्ञान यामध्ये मागच्या शतकात अनेक बदल आहेत. १९९३ पूर्वीचे जग आणि नंतरचे जग यात फार फरक आहे. १९९३ साली इंटरनेटचे व्यावसायिकीकरण झाले आणि जग झपाट्याने बदलले. अख्ख जग कंपन्यांसाठी मार्केट म्हणून उपलब्ध झाले. डब्ल्यु.टी.ओ. ने अख्ख्या जगाला एकत्र आणले. डिजिटल इफ्रास्ट्रक्चरची व्याप्ती प्रचंड वाढली असून येणाऱ्या काळात सत्तर टक्के शिक्षण डिजिटल पद्धतीने दिल्या जाणार आहे. टेक्नॉलॉजीमध्ये सर्वच देश स्पर्धेत आहे. भारताने सुद्धा या क्षेत्रात आपले बलस्थान निर्माण केले आहे, असे सांगून फाईव्ह-जी टेक्नॉलॉजी सुद्धा भारतात आली असून कोव्हिडच्या पार्श्वभूमिवर बदललेल्या जगात आपल्या युवकांना अनेक संधी आहे, त्या संधीचा सर्वांनी लाभ घ्यावा, असेही ते म्हणाले.

विषयावर मांडणी करतांना मोडक यांनी ब्लॉग लेखन कसे करावे, ब्लॉग कशासाठी लिहीले जातात, ब्लॉगर होणे अवघड कां वाटते, ब्लॉगचा विषय कसा निवडावा, स्वतःच्या ब्लॉगची पूर्वतयारी, ब्लॉगचे प्रकारे, फोटो, व्हिडीओ कसे द्यावेत, ब्लॉगमध्ये काय टाळावे, कमर्शियल ब्लॉग यशस्वी कसा होईल, ब्लॉग जास्तीतजास्त वाचकांपर्यंत कसा पोहोचवावा, त्यासाठी कोणते प्लॅटफॉर्म उपलब्ध आहेत, त्यामधून चांगले पैसे व इमेज कशी निर्माण होवू शकते, याबाबत मुद्देसुद माहिती विषयाच्या अनुषंगाने त्यांनी दिली. याशिवाय सोशल मिडीया, बँकेचे अकॉऊन्ट व अन्य इंटरनेटवरील जे काही आपण वापरतो, ते वापरत असतांना कुठली खबरदारी आपण घेतली पाहिजे, त्यासाठी पाळावयाचे सुरक्षतेचे नियम, यावर सविस्तर माहिती देवून हॅकर्सच्या जाळ्यात आपण अडकणार नाही आणि त्यामुळे कुठलीही आर्थिक व सामाजिक नुकसान सहन करावे लागू नये, यासाठी महत्वपूर्ण माहिती व पद्धती त्यांनी व्याख्यानाच्या माध्यमातून सांगितल्या.

निवेदन व पाहुण्यांचा परिचय मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. प्रणव कोलते यांनी करुन दिला. वक्त्यांची व्याख्याने विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर व्हर्च्युअल सी-फोर अंतर्गत उपलब्ध असून त्याचा जास्तीतजास्त लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने प्र-कुलगुरू तथा व्हर्च्युअल सी-फोरचे अध्यक्ष डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व व्हर्च्युअल सी-फोरच्या समन्वयक डॉ. मोना चिमोटे यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २२/०७/२०२०.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:\Users\PRO\Desktop\UNIVERSITY NEWS 2020 66